दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४२९ वा ● शुक्रवार, ता. १७ ऑक्टोबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

# ज्ञान नव्हे तर कौशल्यच व्यक्तीला यशस्वी बनवते- मंत्री राजनाथ सिंह

**पुणे । रयत समाचार**

जग झपाट्याने बदलत आहे आणि या अनिश्चित युगात केवळ ज्ञान नव्हे तर कौशल्यच व्यक्तीला यशस्वी बनवते, असे प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले. ते सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या सहाव्या पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, ले. जनरल धीरज सेठ, कुलपती डॉ. शां.ब. मुजुमदार, प्र-कुलगुरू डॉ. स्वाती मुजुमदार, संजिवनी मुजुमदार, तसेच डॉ. विद्या येरवडेकर उपस्थित होते. ''देशात प्रत्येक क्षणी नवे तंत्रज्ञान, नवे विचार उदयास येत आहेत. अशा काळात आपल्या कौशल्याचे भांडारच आपल्या यशाचे प्रमुख साधन ठरते.

केंद्र आणि राज्य सरकारने मिळून कौशल्य प्रशिक्षणासाठी अनेक सुविधा उभ्या केल्या आहेत,'' असे सिंह म्हणाले. प्रधानमंत्री




कौशल्य विकास योजनेअंतर्गत आतापर्यंत १ कोटी ६३ लाख उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले असून ग्रामीण व आदिवासी भागातील ३० लाखांहून अधिक नागरिकांना शिवणकाम, भरतकाम, हस्तकला, फळ प्रक्रिया व आरोग्य सेवा सहाय्यकाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. ''देशातील युवकांकडे जर कौशल्य असेल, तर जगातील कोणतीच शक्ती भारताला रोखू शकत नाही,'' असे सिंह यांनी ठामपणे सांगितले. ''ऑपरेशन सिंदूर हे भारताच्या आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहे. देशात तयार झालेल्या शस्त्रास्त्रांचा उपयोग करून भारतीय लष्कराने पराक्रम गाजवला,'' असे सिंह म्हणाले. सध्या संरक्षण साहित्य निर्मितीचा आकडा ४६ हजार कोटींवरून १.५ लाख कोटींपर्यंत पोहोचला असून, त्यात ३३ हजार कोटी रुपयांचे खासगी क्षेत्राचे योगदान आहे.

२०२९ पर्यंत ही क्षमता ३ लाख कोटी रुपयांपर्यंत आणि निर्यात ५० हजार कोटींवर नेण्याचे उद्दिष्ट आहे, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कौशल्याचे महत्त्व ओळखून देशात 'कौशल्य विकास अभियान' सुरू केले. त्या धर्तीवर सिम्बायोसिसने 'कौशल्य विद्यापीठा'ची कल्पना साकारली. महाराष्ट्रात या क्षेत्रासाठी मजबूत पायाभूत सुविधा निर्माण करून राज्याला संरक्षण तंत्रज्ञानाचे 'हब' बनविण्याचा प्रयत्न सुरू आहे.'' फडणवीस यांनी पुढे सांगितले, ''देश महासत्ता बनवायचा असल्यास तरुणाईला कौशल्य प्रदान करणे आवश्यक आहे. सिम्बायोसिस विद्यापीठाने शिक्षणासोबत मूल्यांचा संगम साधला असून हे मॉडेल देशासाठी मार्गदर्शक ठरेल.'' संरक्षण मंत्री व मुख्यमंत्री यांच्या हस्ते १,५३२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यापैकी २ विद्यार्थ्यांना सुवर्ण पदक, २ जणांना आत्मनिर्भर पुरस्कार, आणि १ विद्यार्थिनीला कुशल पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान स्कूल ऑफ डिफेन्स अँड एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे उद्घाटनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कुलपती डॉ. मुजुमदार म्हणाले, ''देशाला रोजगारक्षम कुशल युवकांची गरज आहे. केवळ नोकरीसाठी नव्हे तर जगाच्या कल्याणासाठी ज्ञानाचा उपयोग करा. शिक्षणासोबत मूल्यांची जपणूक आणि धैर्याने आव्हानांना सामोरे जाणे हेच यशाचे सूत्र आहे.



# काणकोण लोकोत्सवाचे राष्ट्रपतींना आमंत्रण

## १९ ते २१ डिसेंबरला आयोजन

**नवी दिल्ली । रयत समाचार**

काणकोण येथे ता. १९ ते २१ डिसेंबर २०२५ रोजी या तीन दिवसांमध्ये होणाऱ्या २५ व्या रौप्य महोत्सवी लोकोत्सवाच्या उद्घाटनासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना आमंत्रण देण्यात आले आहे. गोव्याचे क्रीडा व युवा व्यवहार, आदिवासी कल्याण तसेच कला व संस्कृती मंत्री डॉ. रमेश तवडकर यांनी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात राष्ट्रपतींना भेटून हे आमंत्रण सुपूर्त केले. या प्रसंगी केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकरही उपस्थित होते. २००० सालापासून आदर्श युवा संघाच्या वतीने आयोजित होणारा काणकोण लोकोत्सव आता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेचा विषय बनला आहे. कला, संस्कृती, क्रीडा, लोककला, निसर्गोपचार, आयुर्वेद, आदिवासी परंपरा अशा विविध गोमंतकीय वैशिष्ट्यांनी युक्त या लोकोत्सवाचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. यंदाच्या महोत्सवासाठी मंत्री डॉ. रमेश तवडकर यांनी राष्ट्रपतींना उद्घाटनासाठी उपस्थित राहण्याची विनंती केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासोबत मंत्री डॉ. तवडकर आणि राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची सुमारे अर्धा तास चर्चा झाली. या भेटीत गेल्या २४ वर्षांत लोकोत्सवाद्वारे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम, रोजगार निर्मिती उपक्रम, श्रमधाम योजना अंतर्गत गरीब गरजूंना घर बांधून देण्याचे प्रकल्प तसेच बलराम शिक्षण संस्थेद्वारे ग्रामीण गोव्यातील शैक्षणिक क्षेत्रातील यशस्वी प्रयोग यांची माहिती दिली गेली. ६४ व्या गोवा मुक्ती दिनाच्या दिवशी सुरू होणाऱ्या यंदाच्या लोकोत्सवात देशभरातील आदिवासी आणि लोककलाकार तसेच आशियातील आणि युरोपमधील सांस्कृतिक कलाकारही उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या लोकोत्सवाला उपस्थित राहण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले आहे.



# पत्रकारांना कॅशलेस आरोग्य सेवा देणार

**मुंबई । रयत समाचार**

राज्यातील पत्रकारांसाठी कॅशलेस आरोग्य सेवा उपलब्ध करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या निर्देशानुसार विशेष समिती स्थापन करण्याचे निर्णय घेण्यात आले. ही समिती महात्मा फुले जन आरोग्य योजना, केंद्र शासनाच्या आरोग्य योजना, तसेच मध्यप्रदेश सरकारच्या कॅशलेस आरोग्य योजना यांचा अभ्यास करून पत्रकारांसाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करणार आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, ''मोठ्या शहरांतील पत्रकारांना कॅशलेस आरोग्य सेवा देण्यासाठी एक व्यापक आराखडा तयार करावा. 'सीएसआर' माध्यमातूनही या सुविधेची शक्यता तपासावी.'' सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी पत्रकारांसाठी वर्षातून दोन वेळा विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचे तसेच महिला पत्रकारांसाठी स्वतंत्र शिबिरे घेण्याचे निर्देश दिले. तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत पत्रकारांना आरोग्य कार्डचे वाटप करावे आणि शंकरराव चव्हाण पत्रकार सन्मान निधी योजना आणखी व्यापक करण्याचा प्रस्ताव तयार करावा, असे त्यांनी सांगितले. या बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते निपुण विनायक (सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग), धीरज कुमार (सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग), कादंबरी बलकवडे (आरोग्य सेवा आयुक्त), डॉ. अनिल भंडारी (वैद्यकीय शिक्षण आयुक्त), किशोर गांगुर्डे (संचालक, माहिती), रामेश्वर नाईक (मुख्य, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष), यदु जोशी (अध्यक्ष, राज्य अधिस्वीकृती समिती), दिलीप सपाटे (अध्यक्ष, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ), किरण नाईक (विश्वस्त, मराठी पत्रकार परिषद), दीपक कैतके (अध्यक्ष, मुंबई विभागीय अधिस्वीकृती समिती), तसेच अन्य सदस्य आणि पत्रकार प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत पत्रकारांच्या आरोग्य समस्या आणि त्यासाठी शासनाद्वारे उपलब्ध होणाऱ्या सुविधा यावर सविस्तर चर्चा झाली. या पुढाकारामुळे राज्यातील पत्रकारांना त्यांच्या आरोग्याच्या सुरक्षा आणि सुविधा मिळविण्यास मोठा मार्ग सुकर होणार आहे.

# मतचोरीचे गंभीर आरोप! रोहित पवार यांनी दाखवले डोनाल्ड ट्रम्प यांचे आधारकार्ड

## मतदारसंघातील वाढीव मतदारांचे आकडे केले जाहीर

**मुंबई । रयत समाचार**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी ता. १६ ऑक्टोबर २०२५ पत्रकार परिषद घेऊन मतचोरीचे गंभीर आणि स्फोटक आरोप केले. विधानसभा निवडणुकीदरम्यान विविध मतदारसंघांमध्ये मतदारांची संख्या अचानक वाढल्याबद्दल त्यांनी आकडेवारीसह सविस्तर माहिती देत निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उभे केले. मतदारसंघनिहाय वाढलेले आकडे: रोहित पवार यांनी पुणे आणि इतर काही भागांतील मतदारसंघांमध्ये वाढलेल्या मतदारांची संख्या सांगितली. शिरूर विधानसभा मतदारसंघात १०,२३० नावे, वडगाव शेरीत ११,०६४, खडकवासला येथे १२,३३०, पर्वती मतदारसंघात ८,२३८, हडपसर मतदारसंघात १२,७९८ केवळ पिंपरी विभागात ५४,००० मतदारांचा घोळ झाल्याचा त्यांचा दावा आहे. या वाढलेल्या मतदारांना शोधण्यासाठी कार्यकर्ते गेले असता एकही व्यक्ती आढळली नाही. अशोक पवार यांनी आरोप केल्याप्रमाणे, लोकांना बसने आणले गेले, मतदान करून घेतले आणि पैसे देऊन पुन्हा त्यांच्या मूळ मतदारसंघात पाठवले गेले. सहा महिन्यांत मोठी वाढ: लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या मधल्या सहा महिन्यांच्या काळात काही मतदारसंघांत मोठ्या प्रमाणात मतदार वाढल्याचा दावाही रोहित



पवार यांनी केला.

**पनवेल: ६५,००० मतदार, कल्याण ग्रामीण : ५७,००० मतदार, भोसरी : ५६,००० मतदार, मीरा भाईंदर : ५३,००० मतदार, नालासोपारा: ५०,००० मतदार, चिंचवड : ४५,००० मतदार, हडपसर : ४३,००० मतदार.**

आधारकार्ड आणि मतदारांची नोंद: रोहित पवार यांनी त्यांच्या आरोपांना अधिक गंभीर स्वरूप देण्यासाठी चक्क अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे आधारकार्ड प्रिंट करून दाखवले. ट्रम्प यांचे जसे आधारकार्ड काढले गेले, त्याचप्रमाणे अनेकांनी बोगस आधारकार्ड बनवले आणि त्याआधारे मतदार ओळखपत्र मिळवले, असा गंभीर दावा त्यांनी केला. एकाच व्यक्तीचे नाव मतदार यादीत अनेकवेळा असल्यामुळे त्या व्यक्तीने अनेकदा मतदान केले असण्याची शक्यताही त्यांनी वर्तवली. भाजप पदाधिकाऱ्यांवर गंभीर आरोप: निवडणूक आयोगाच्या कामाकाजावरही त्यांनी गंभीर आक्षेप घेतले. निवडणूक आयोगाच्या वेबसाइटचे इंटरनेट आणि देखभालीची जबाबदारी देवांग दवे नावाच्या व्यक्तीकडे निवडणूक आयोगाने दिली आहे. हे दवे भाजपचे पदाधिकारी आहेत. त्यामुळे, कुणाला मतदार यादीत ठेवायचे आणि कुणाचे नाव काढायचे, याची सर्व माहिती भाजप पदाधिकाऱ्यांकडे उपलब्ध होती. त्यांनीच ही मेथडोलॉजी डिझाईन केली आणि मतदारसंघातील आमदारांना विश्वासात घेऊन हे काम केल्याचा रोहित पवार यांचा ठाम आरोप आहे. रोहित पवार यांच्या मागण्या: या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी निवडणूक आयोगाकडे खालील मागण्या केल्या आहेत:

१. अचानक वाढलेल्या मतदारांची सविस्तर माहिती लेखी स्वरूपात स्पष्टपणे द्यावी. २. डिजिटल मतदार याद्या उपलब्ध करून द्याव्यात. ३. बीएलओच्या (बूथ लेव्हल ऑफिसर) डायरीतील नोंदी कशा झाल्या, याची माहिती मिळावी. ४. मतदानाच्या दिवसाचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करून द्यावे. ५. मतदानाच्या शेवटच्या तासात ६८ लाख लोकांनी मतदान केले. ते कोण होते, याची माहिती हवी आहे. रोहित पवार यांनी केलेल्या या खळबळजनक दाव्यांमुळे राज्याच्या राजकारणात मोठी चर्चा सुरू झाली असून, यावर निवडणूक आयोग आणि संबंधित पक्षांकडून काय प्रतिक्रिया येते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.






# दै. मुक्तागिरी दिवाळी अंकाचे थाटात प्रकाशन

## मराठी भाषा, वाचन संस्कृतीला बळ

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

साहित्याची मेजवानी असलेल्या दै. मुक्तागिरी (मुक्तांगण) दिवाळी अंकाचे काल बुधवारी थाटात प्रकाशन करण्यात आले. सकाळी वडगावची ग्रामदेवता श्रीमंगाई देवी मंदिरात शांताराम पाटील, सुनंदा पाटील, संगीता स्वीटचे संचालक जगन्नाथ पाटील, रामू पाटील, मंदिराचे भडजी सौरभ चव्हाण पाटील आणि श्रीकांत काकतीकर यांच्या हस्ते देवीची पूजा-आरती करण्यात आली. सायंकाळी वडगाव शहापूर रोड येथील वेदांत सोसायटी कार्यालयात आयोजित कार्यक्रमास बेळगाव महापालिकेचे कर्तव्यदक्ष नगरसेवक नितीन जाधव, रोटरीचे माजी अध्यक्ष डी. बी. पाटील, ब्लू स्टार ऐल्व्हेटरचे संचालक राहुल महालंक, तसेच वेदांत सोसायटीचे चेअरमन संदीप खन्नुकर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी वेदांत सोसायटीच्या संचालकांसह इतर मान्यवरांनी दिवाळी अंकाच्या माध्यमातून मराठी भाषा, संस्कृती आणि वाचन संस्कृतीला बळ देण्याचे काम बेळगाव सीमाभागात चालविले असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमात सांगितले गेले की, आजच्या माध्यमांमध्ये अनेक बिकट समस्या असून, दिवाळी अंक प्रकाशित करणे एक आव्हानात्मक कार्य आहे. दिवाळी हा सण तेजाचे प्रतीक असून, भारतीय खाद्य संस्कृतीचा एक आगळा उत्सव आहे. दिवाळी अंकाच्या माध्यमातून साहित्य संस्कृतीचा सुगंध दरवळणे हा उपक्रम महत्त्वाचा आहे. या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नगरसेवक नितीन जाधव आणि फेसबुक सर्कलचे सामाजिक कार्यकर्ते संतोष दरेकर यांचा शाल, स्मृतीचिन्ह आणि पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत जयवंत खन्नुकर यांनी केले, तर प्रास्ताविक आणि आभार संदीप खन्नुकर यांनी मांडले. यावेळी ज्ञानेश्वर सायनेकर, हिरालाल चव्हाण, वेदांत सोसायटीच्या व्यवस्थापिका विद्या उच्चुकर यांच्यासह इतर वाचनप्रेमी उपस्थित होते. रयत समाचार

# कनेरी स्वामींना विजयपूर जिल्ह्यात प्रवेशबंदी

**विजयपूर । श्रीकांत काकतीकर**

अलीकडे एका कार्यक्रमात कनेरी मठाचे अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामी यांनी बसव संस्कृती अभियान आणि लिंगायत मठाधीशांबद्दल अपमानास्पद व धार्मिक भावना दुखावणारे वक्तव्य केल्याने तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. या पार्श्वभूमीवर विजयपूर जिल्हा प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून स्वामीजींना १४ डिसेंबरपर्यंत जिल्ह्यात प्रवेश करण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. माहितीनुसार, महाराष्ट्रातील जत तालुक्यातील बीळूर येथे अलीकडे पार पडलेल्या कार्यक्रमात अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी यांनी लिंगायत मठाधीशांच्या संघटनेद्वारे राज्यात राबवण्यात येणाऱ्या बसव संस्कृती अभियानावर आणि या अभियानाचे नेतृत्व करणाऱ्या मठाधीशांवर अवमानकारक व अपशब्द वापरले होते. यामुळे



विजयपूर, बसवकल्याण, कूडलसंगम, बेळगाव, दावणगेरे, बीदर, गदग आदी भागांमध्ये निषेध नोंदवण्यात आला आहे. बसवनबागेवाडीमध्ये समर्थ सद्गुरु सिद्धरामेश्वर महाराज यांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमात स्वामीजी उपस्थित होणार असल्याची माहिती मिळाल्याने, कार्यक्रमात गोंधळ होण्याची आणि कायदा व सुव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांच्या शिफारशीनुसार जिल्हाधिकारी डॉ. आनंद के. यांनी स्वामीजींना १४ डिसेंबरपर्यंत बसवनबागेवाडी आणि विजयपूर जिल्ह्यात प्रवेशास बंदी घालणारा आदेश जारी केला आहे. रयत समाचार

# स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस २१ लाख

**अक्कलकोट । श्रीकांत काकतीकर**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस २१ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना बुधवारी सोलापूर येथील कार्यक्रमात सुपूर्त करण्यात आला. या सोहळ्यात मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली ही देणगी सुपूर्त करण्यात आली.

दरम्यान, सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आवाहनानुसार सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्त नागरिकांना



जीवनावश्यक धान्य शिधा किट सुमारे ५० लाख रुपयांचे व ५ हजार नग व हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थाच्या माध्यमातून १ हजार साड्या पूरग्रस्त महिलांना जिल्हा प्रशासनाकडे सुपूर्त करण्यात आल्या आहेत. सोलापूर ते मुंबई विमानसेवेच्या शुभारंभ प्रसंगी धनादेश सुपूर्त करताना केंद्रीय नागरी उड्डाण राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, पालक मंत्री जयकुमार गोरे, परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक, माजी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, देवेंद्र कोठे, तसेच स्टार एअरलाईन्सचे संजय घोडावत, अन्नछत्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व इतर मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रसंगी धार्मिक कार्यासोबतच सामाजिक कार्याच्या चढत्या आलेखाबद्दल श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या कार्याचे कौतुक केले. या देणग्या व धनादेशाद्वारे पूरग्रस्त नागरिकांना आणि महिलांना मिळालेल्या मदतीने सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक उपक्रमांना चालना मिळाली आहे. रयत समाचार

# मेहेरबाबांच्या नवजीवन यात्रेला ७६ वर्षे पूर्ण

## समाधीस्थळी भाविकांची गर्दी

**अहमदनगर । रयत समाचार**

अवतार मेहेरबाबांनी १६ ऑक्टोबर १९४९ रोजी सुरू केलेल्या नवजीवन यात्रेला आज ७६ वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमित्ताने मेहेराबाद येथील बाबांच्या समाधीस्थळी सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. या प्रसंगी वातावरण भक्तिभावाने भारावले होते. डॉ. मेहेरनाथ कलचुरी यांनी माहिती देताना सांगितले की, मेहेरबाबांनी नवजीवन यात्रेला प्रारंभ करण्यापूर्वी स्वतःची आणि आपल्या वीस शिष्यांची सर्व चल-अचल संपत्ती त्यागून दुसऱ्यांच्या नावावर केली होती. संपूर्ण जीवन देवाच्या भरवश्यावर जगण्याचा आणि सांसारिक सर्व बंधनांपासून मुक्त होण्याचा हा अद्वितीय प्रयोग होता. कलचुरी पुढे म्हणाले, ''मेहेरबाबांनी श्रमयुक्त, ध्यानधारणेने भरलेले, भिक्षा मागून



जगणारे आणि सतत भटकंती करणारे दोन वर्षांचे जीवन व्यतीत केले. या काळात त्यांनी बनारस येथे आपले सर्व सामान इतरांना वाटून टाकले आणि जीवनातील चार प्रतीक म्हणून पांढरा घोडा (शांतीचे प्रतीक), गाढव (कष्टाचे प्रतीक), उंट (सहनशक्तीचे प्रतीक) आणि गाय (त्यागाचे प्रतीक) हे चार प्राणी आपल्या यात्रेत सहभागी केले.'' नवजीवन प्रवासादरम्यान मेहेरबाबांनी ईश्वरत्वाची कवचकुंडले बाजूला ठेवून साध्या साधकाप्रमाणे निर्हेतुक जीवन जगले. सर्वसंग परित्याग करून, नातेसंबंध तोडून, इच्छा-वासना सोडून त्यांनी संन्यस्त वृत्तीने भिक्षा मागून गुजराण केली. हा प्रवास कधी पायी, कधी बैलगाडीत, तर कधी रेल्वेने दोन वर्षे चालला. ''भूमीचे अंथरूण आणि आकाशाचे पांघरूण'' या भावनेने त्यांनी उघड्यावर झोपत साधेपणाने जीवन व्यतीत केले. खिशात एक पैसाही न ठेवता निराधार जीवन जगणे हा या नवजीवनाचा मुख्य संदेश होता. १६ ऑक्टोबर १९४९ रोजी मेहेरबाबांनी नवजीवनात प्रवेश केला. ''मी ईश्वर आहे'' या जाणिवेचा त्याग करून त्यांनी सामान्य साधकाची भूमिका स्वीकारली. सर्वच नातेसंबंध, संपत्ती आणि अपेक्षा त्यागून ईश्वरावर संपूर्ण विश्वास ठेवून साधकाने जीवन कसे जगावे याचा त्यांनी जगासमोर जिवंत वस्तुपाठ ठेवला. माधुकरी मागत, भटके जीवन जगत त्यांनी अखेर ''मनोनाश'' म्हणजेच अंतर्गत मनाचा नाश साध्य केला आणि नवजीवन पर्वाची सांगता केली.



# सरन्यायाधीश भूषण गवई हल्ला, सोनम वांगचुक अटकेविरोधात भाकपची निदर्शने

## केंद्र व राज्य सरकारवर लोकशाहीची मुस्कटदाबी करत असल्याचा आरोप

**अहमदनगर । रयत समाचार**

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर खुल्या न्यायालयात झालेल्या बूटफेकी घटनेचा आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या बेकायदेशीर अटकेचा निषेध म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) गुरुवार, ता. १६ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केले. या आंदोलनात कार्यकर्त्यांनी ''लोकशाही वाचवा!'', ''न्यायसंस्थेचा अपमान थांबवा!'', ''सोनम वांगचुक यांना मुक्त करा!'' अशा घोषणांनी परिसर दणाणून टाकला. भाकपचे राज्य सचिव कॉ. सुभाष लांडे, कॉ. स्मिता पानसरे, किसान सभेचे कॉ. बन्सी सातपुते, आयटकचे जिल्हा सचिव कॉ. अ‍ॅड. सुधीर टोकेकर, कॉ. आप्पासाहेब वाबळे, भारत अरगडे, भारती न्यालपेल्ली, प्रा. डॉ. सुभाष कडलग, कॉ. सतीश पवार, सगुना श्रीमल, संगीता कोंडा, लावण्या न्यालपेल्ली, कॉ. सुनील दुधाडे, राजेंद्र व्यवहारे, महादेव पालवे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला. भाकपच्या नेत्यांनी केंद्र व राज्य सरकारवर लोकशाहीची मुस्कटदाबी करत असल्याचा आरोप केला. सरन्यायाधीशांवरील हल्ल्याला न्यायव्यवस्थेवरील थेट हल्ला म्हणत, सर्वोच्च न्यायालयावर अशा प्रकारे बूटफेक होणे भारतीय संविधान आणि न्यायव्यवस्थेचा अपमान असल्याचे ठळक केले. दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट केले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी शिक्षणतज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना राष्ट्रीय सुरक्षा कायदा (एनएसए) अंतर्गत करण्यात आलेल्या अटकेचा तीव्र निषेध नोंदवला. सोनम वांगचुक हे पर्यावरण, शिक्षण व सामाजिक न्यायासाठी अहिंसक मार्गाने लढणारे कार्यकर्ते असल्याचे सांगितले. भाकपच्या वतीने सरन्यायाधीश भूषण गवईंवर बूटफेक करणाऱ्यांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याची आणि सोनम वांगचुक यांच्या अट रद्द करून तात्काळ सुटका करण्याची मागणी करण्यात आली.

# दिवाळीपूर्वी स्वच्छता, फवारणी व रस्तेदुरुस्ती करा- स्वप्निल शिंदे

**अहमदनगर । रयत समाचार**

दिवाळी सण काही दिवसांवर येऊन ठेपला असून नागरिकांच्या आरोग्य आणि परिसरातील स्वच्छतेसाठी स्वप्निल शिंदे यांनी वार्ड क्र. १३ मधील सर्व भागात तातडीने स्वच्छता मोहीम, औषध फवारणी आणि रस्त्यांवरील खड्ड्यांची दुरुस्ती करण्यासाठी मनपा आयुक्तांकडे निवेदन दिले आहे. शिंदे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, मार्केट यार्ड रोड, सत्ता कॉलनी, अरिहंत कॉलनी, नवजीवन कॉलनी, राऊत मळा, कानडे मळा, आशीर्वाद कॉलनी, शांतीनगर, कोंबडीवाला मळा, माळीवाडा, नवीन टिळक रोड, तीन नंबर बसस्थानक, झेंडीगेट, जीपीओ, चंदूकाका सराफ परिसर, कृषी उत्पन्न बाजार समिती, आनंदधाम, गणेशवाडी, नंदनवन कॉलनी, सीएसआरडी, धुत बिल्डिंग,



हेरिटेज, जुने बसस्थानक, वाडिया पार्क, सुगंधी चाळ, आर नियोजन भवन, वायएमसी ग्राउंड, सातघर परिसर व एमईसीबी ऑफिस रोड या सर्व भागांमध्ये स्वच्छता, औषध फवारणी आणि रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये मुरूम टाकून दुरुस्ती करावी. त्यांनी तसेच वाढलेले गवत तातडीने कापण्याचे आणि घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले ठिकाणे त्वरित स्वच्छ करण्याचेही आवाहन केले आहे. काही रस्त्यांवरील खड्डे व वाढलेले गवत वाहन वाहतुकीस अडथळा निर्माण करत असून, शाळकरी मुलांच्या अपघाताचा धोका वाढल्याचे शिंदे यांनी नमूद केले आहे. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि सुंदर दिसावा यासाठी मनपाने त्वरित कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल शिंदे यांनी केली आहे.



# 'ज्ञानदीप अभियान'द्वारे पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवी दिशा

**अहमदनगर । रयत समाचार**

राज्यातील अलीकडील अतिवृष्टीमुळे अनेक भागांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली असून शेकडो विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य वाहून गेले आहे. वह्या, पुस्तके, पेन, बॅग यांचा अभाव असल्याने अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण अडथळ्याच्या मार्गावर आहे. या पार्श्वभूमीवर अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन (AMS) ने ''ज्ञानदीप अभियान'' हाती घेतले आहे. या अभियानांतर्गत पूरग्रस्त विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी दत्तक घेऊन आवश्यक शैक्षणिक साहित्य वह्या, पुस्तके, बॅग, पेन, कंपास बॉक्स इत्यादी विनामूल्य दिले जात आहे. १३ ऑक्टोबर रोजी पाथर्डी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भट्टीवाडी येथे AMS फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य हेच या उपक्रमाचे खरे यश असल्याचे AMS फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ तसेच फाउंडेशनचे कार्यकर्ते अशोक गाडे, संदीप नवसुपे, मनोज सोनवणे, श्रीपाद दगडे, भरत सुंबे, संतोष बेरड, सिद्धांत पानसरे आणि अहिल्यानगर AMS टीम उपस्थित होते. एका विद्यार्थ्याच्या शैक्षणिक साहित्य किटसाठी अंदाजे ४०० ते ५०० रुपयांचा खर्च येतो. या उपक्रमात महाराष्ट्र आणि गुजरातमधील सदस्यांनी आर्थिक व वस्तू स्वरूपात मोलाचे योगदान दिले आहे. पुढील टप्प्यात मराठवाडा व सोलापूर (माढा) परिसरातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांपर्यंत ही मदत पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. फाउंडेशनकडून सांगण्यात आले की, ''ही फक्त सुरुवात आहे. जोपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात पुस्तक व चेहऱ्यावर हसू दिसत नाही, तोपर्यंत आमचा प्रवास सुरूच राहील.'' अधिक माहिती व संपर्क: आनंद गुळूमकर ८१८०९ २७७००, मनोज सोनवणे ७५८८० ०४५५१, अशोक गाडे ८८८८८९५८९२, अभिजित डेरे ९६६४२ ४७०२७, अतुल बिराजदार ७७४३९ ११७११, राहुल पवार ८१८०९ १३३५५, प्रवीण सपकाळ ९१४६८ ३८४८५ देणगीसाठी अधिकृत खाते: Akhand Maratha Samrajya Foundation, Union Bank of India, Warje Malwadi Branch, Pune, A/c No.: 608902010020688 | IFSC: UBIN0560898 या दिवाळीत फटाके नव्हे, तर ज्ञानाचा दिवा लावूया! पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी एकत्र येऊया!

# बास्केटबॉल स्पर्धेत नालंदा स्कूल मुलींचा संघ उपविजेता

## दोन विद्यार्थिनींची विभागीय स्तरावर निवड



**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आठरे पाटील पब्लिक स्कूल येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत सोलापूर रोडवरील नालंदा स्कूलच्या मुलींच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत वय वर्ष १७ गटात उपविजेतेपद पटकावले. या स्पर्धेत नालंदा विद्यालयाच्या संघातील दिशा गांधी व मृणाल पालवे या दोन विद्यार्थिनींची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या यशामुळे विद्यालयाचा नावलौकिक वाढला आहे. विजयी संघाचे विद्यालयाच्या वतीने गौतम बहादुर्गे व क्रीडाशिक्षक शादाब मोमीन यांनी अभिनंदन करून विद्यार्थिनींचे कौतुक केले.

# बागडपट्टीचा राजा प्रतिष्ठानच्या जिवंत देखाव्याला प्रथम पारितोषिक



**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित गणेशोत्सव देखावे स्पर्धा २०२५ मध्ये बागडपट्टीचा राजा प्रतिष्ठान ट्रस्टच्या जिवंत देखावा/सोशल मीडिया व आधुनिक तंत्रज्ञान श्रेणीतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. मंडळाच्या वतीने महाअवतार नृसिंहस्वामी या जिवंत देखाव्याचे साकारले होते. महापालिकेच्या सभागृहात झालेल्या समारंभात सहा. आयुक्त सपना वसावा यांच्या हस्ते ट्रस्टचे संस्थापक-अध्यक्ष दिलदारसिंग बीर, उपाध्यक्ष किरण डफळ, कार्याध्यक्ष अजय दराडे, सचिव कुणाल गोसके, खजिनदार वरुण मिस्कीन यांना सन्मानचिन्ह व पारितोषिक प्रदान करण्यात आले. यावेळी मंडळाचे गणेश म्याना, राजु गड्डम, महेश सब्बन, जिग्नेश जग्गड, राजु पठारे, दत्ताभाऊ बेत्ती, संजय नाना कांबळे, सुमित गोसके, मयुर चिलवर, प्रथमेश संभार, रोहित म्याना, सुरज गोंधळी, संकेत जक्कल, सर्वेश सब्बन, प्रथम सिंग आदींसह शहरातील गणेशभक्त आणि विविध मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.. दिलदारसिंग बीर म्हणाले की, दरवर्षी प्रतिष्ठान ट्रस्ट धार्मिक, सामाजिक आणि जनजागृतीवर आधारित भव्य देखावे सादर करत असतो. यावर्षी महाअवतार नृसिंहस्वामी या जिवंत देखाव्याला गणेश भक्तांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि महापालिकेने त्याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करून दखल घेतली. ट्रस्ट वर्षभर विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम सातत्याने राबविते आणि युवा वर्ग मोठ्या प्रमाणावर जोडले आहे. स्पर्धेचे परीक्षण मेहेर लहारे, प्र. मुख्यलेखाधिकारी श्री. गणेश लयचेट्टी, प्रसिद्धी व संस्कृतिक विभाग प्रमुख शशिकांत नजन, क्रीडा विभाग प्रमुख व्हिन्सेंट फिलिप्स, परीक्षक श्रेणिक शिंगवी, संदीप जाधव, ठाकुरदास परदेशी, तेजस अतितकर यांनी केले. देखाव्यासाठी ऑरा डान्स अ‍ॅकेडमी चे सागर जाधव, प्रणव लोखंडे, प्रेम उदमले, पृथ्वी धुमाळ यांनी विशेष सहकार्य केले. मंडळाने सर्व देणगीदार, भाविक भक्त, मार्गदर्शक, सभासद व मित्रपरिवाराचे आभार मानले असून, पुढील वर्षी आणखी भव्य आणि तंत्रज्ञानाधारित देखावा सादर करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

## ग्रामीण उद्योजकतेचा नमुना

# पिंपळगाव माळवीत दुग्ध क्रांती, तालुक्यातील दहा युवकांना रोजगार



**नगरतालुका । रयत समाचार**

ग्रामीण भागातील बेरोजगारीवर मात करण्यासाठी आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी पिंपळगाव माळवी येथील दोन युवकांनी प्रेरणादायी पाऊल उचलले आहे. नगर तालुक्यातील आकाश साबळे व तेजस झिने हे पदवीधर युवक गेल्या चार वर्षांपासून घरच्या दुग्ध व्यवसायासोबत दूध संकलन करीत आहेत.

या वर्षी त्यांनी दुध शीतकरण प्लांट सुरू करून व्यवसायाला नवीन गती दिली. हा प्लांट केवळ दूध संकलन नाही तर गावातील शेतकऱ्यांना आणि युवकांना रोजगाराची संधी देत आहे. दोन्ही युवक नोकरीच्या मागे न लागता छोटे व्यवसाय सुरू करून दररोज पाच हजार लिटर दूध संकलन करून स्थानिक बाजारपेठेत पाठवतात. यामुळे दुधाचे नुकसान कमी झाले व शेतकऱ्यांना जास्त किंमत मिळू लागली. त्यांनी गावातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना दुग्ध व्यवसायात प्रोत्साहन दिले व गाई घेण्यासाठी आर्थिक मदत केली, ज्यामुळे दहा युवकांना रोजगार मिळाला. या यशस्वी उपक्रमाचा परिणाम म्हणून १६ ऑक्टोबर रोजी दूध संकलन केंद्राच्या वतीने शेतकऱ्यांना २५ लाख रुपयांचा बोनस वाटप करण्यात आला. यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे शाखाधिकारी ससे साहेब, माजी सरपंच संतोष झिने, भरत साबळे, संतोष लिंभोरे, ओंकार झिने, सुरेश झिने, संदीप झिने, गोरख लहारे, दत्ता साबळे, निलेश बारस्कर, विठ्ठल पारकड आणि शेतकरी उपस्थित होते. माजी सरपंच संतोष झिने म्हणाले, ''आकाश साबळे व तेजस झिने यांनी आमच्या पंचक्रोशीतील युवकांसमोर आदर्श ठेवलाय आणि बेरोजगारीतून बाहेर येण्यासाठी मोठी मदत केली आहे.'' आकाश साबळे म्हणाले, ग्रामीण तरुणांना शेती व्यवसायासोबतच रोजगार मिळावा यासाठी आम्ही आर्थिक मदत व प्रोत्साहन देत आहोत.




# महिलांनी स्वतःचा ब्रँड निर्माण करून बाजारपेठ मिळवावी– नारायण परजणे

## ३०० महिलांना २ कोटी रुपयांचे कर्जवाटप

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

चैतन्य महिला बचत गटांची सहकारी पतसंस्था आणि वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळीनिमित्त २ कोटी रुपयांचे कर्ज व साखरवाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी सहाय्यक निबंधक नारायण परजणे होते. तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी म्हणाल्या, ''महिलांनी प्रत्येक क्षेत्रात यश मिळवले आहे, त्यांना केवळ प्रोत्साहनाची गरज आहे.'' परजणे यांनी महिलांनी स्वतःचा ब्रँड निर्माण करून बाजारपेठ मिळवावी, असे आवाहन केले. संस्थापक चेअरमन विठ्ठलराव वाडगे म्हणाले, ''अतिवृष्टी आणि मंदीच्या काळात महिलांना आधार देण्यासाठी हा उपक्रम राबविला आहे. समाजाचे देणे म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ५ लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे.'' अध्यक्षा सायली वाडगे म्हणाल्या, ''लोकांची दिवाळी झाली तरच आपली दिवाळी होईल, या भावनेतून हा उपक्रम दरवर्षी राबविला जातो.'' ३०० महिलांना एकूण २ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रीमा घंगाळे यांनी केले, तर प्रमिला पिसे यांनी आभार मानले. कार्यक्रमास महिला बचत गटांच्या सदस्यांची मोठी उपस्थिती होती. रयत समाचार

# ॲड. वर्पे यांची राष्ट्रवादी जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**कोपरगाव । किसन पवार**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते खा. शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांच्या आदेशानुसार कोपरगावचे तरुण नेते ॲड. संदीप वर्पे यांची अहिल्यानगर ग्रामीण (उत्तर) जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीची घोषणा होताच संपूर्ण जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटनेला नवचैतन्य आणि बळकटी मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. या नियुक्तीबद्दल ॲड. वर्पे यांनी राष्ट्रीय कार्याध्यक्ष खा. सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे, राज्य प्रभारी आ. रोहित पवार, खा. निलेश लंके, माजी मंत्री जयंत पाटील, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे आणि निरीक्षक अंकुश काकडे यांचे आभार व्यक्त केले आहेत. ॲड. वर्पे म्हणाले, ''पक्षाने माझ्यावर दाखवलेला विश्वास हा सन्मानासोबतच जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. पक्षाच्या विचारधारेचा प्रसार करून कार्यकर्त्यांच्या बळावर ग्रामीण भागात राष्ट्रवादी काँग्रेसला भक्कम स्थान मिळविण्यासाठी मी सातत्याने कार्यरत राहीन.'' तसेच त्यांनी आपल्या नियुक्तीबाबत प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार सुनिल भुसारा आणि अमित भांगरे यांचेही विशेष आभार मानले. या नियुक्तीमुळे अहिल्यानगर ग्रामीण (उत्तर) भागातील पक्षबांधणीला नवी दिशा आणि गती मिळेल, तसेच युवक कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. रयत समाचार

# महाऑनलाईन व डिजिटल सातबारा प्रणाली ठप्प; नागरिक त्रस्त, प्रशासनाचे दुर्लक्ष

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

गेल्या तीन दिवसांपासून महाऑनलाईन व डिजिटल सातबारा प्रणाली ठप्प झाल्याने नागरिकांना मोठा त्रास होत आहे. शासनाच्या विविध सेवांसाठी सुरू असलेल्या या ऑनलाइन प्रणालींमध्ये सततच्या तांत्रिक अडचणींमुळे वेबसाईट बंद पडणे किंवा मंद गतीने चालणे सुरू आहे.

ग्रामीण भागातील नागरिक ७/१२ उतारा, फेरफार, जाती, उत्पन्न, रहिवासी, आधार लिंकिंग आदी सेवांसाठी सेवा केंद्रांवर धाव घेत आहेत. मात्र सर्व्हर स्लो असल्याने व्यवहार प्रक्रिया ठप्प झाली आहे. वेबसाईट उघडत नाही किंवा अर्ज सबमिट होताना नेटवर्क तुटत असल्याने नागरिकांना वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांकडून होत असून, सेवा केंद्रचालकही हताश झाले आहेत.

''डिजिटल सुविधा सुरू केल्या, पण त्यांची देखभाल नाही, त्यामुळे सर्वसामान्य माणसाला त्रास सहन करावा लागत आहे,'' अशी नाराजी नागरिकांनी व्यक्त केली. ''वेबसाईट बंद असल्याने शेतकऱ्यांचे फेरफार, विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती फॉर्म, कर्ज अर्ज प्रलंबित आहेत,'' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने तांत्रिक अडचणींवर तातडीने कायमस्वरूपी उपाय करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. रयत समाचार



# निमगाव शाळेत वाचन प्रेरणा व हात धुवा दिन उत्साहात साजरा

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

तालुक्यातील जि.प.प्रा.शाळा निमगाव येथे थोर शास्त्रज्ञ व भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन आणि हात धुवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेतील विद्यार्थी पियुष जाधव यांनी सांभाळले. सुरुवातीला डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक संतोष वाघमोडे यांनी प्रास्ताविक केले आणि डॉ. कलाम यांच्या कार्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी जयंतीनिमित्त मनोगते व्यक्त केले. शिक्षिका सुधा गमे यांनी हात धुवा दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी प्रश्नमंजुषा स्पर्धेत सहभाग घेत बक्षीस पटकावले, तसेच पुस्तकांचे वाचन केले. हात धुवा गीताचे प्रात्यक्षिकासह सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश तरस, उपाध्यक्ष सोनाली साबळे, महेंद्र साबळे, अंगणवाडी सेविका अनिता काजळे, अर्चना पंडित, वैशाली सोनवणे, निर्मला ढोबळे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संतोष वाघमोडे, प्रतिभा तोरणे, मीना निकम आणि सुधा गमे यांनी विशेष परिश्रम घेतले. रयत समाचार

# विशेष सहाय्य योजनेसाठी 'लाभार्थी सत्यापन ॲप'

**अहमदनगर । रयत समाचार**

शासनाच्या विविध सामाजिक योजनांचा लाभ घेण्यासाठी वयोवृद्ध, विधवा व दिव्यांग लाभार्थ्यांना दरवर्षी 'हयातीचे प्रमाणपत्र' सादर करावे लागते. पूर्वी त्यांना तहसील किंवा पंचायत कार्यालयात वारंवार जावे लागत होते, मात्र आता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाने विकसित केलेल्या 'लाभार्थी सत्यापन ॲप'मुळे ही प्रक्रिया घरबसल्या सुलभ झाली आहे.. जिल्ह्यातील ३८,८०२ लाभार्थ्यांपैकी ११,३७२ लाभार्थ्यांनी या प्रणालीचा लाभ घेतला आहे. ॲपमध्ये आधार क्रमांक भरून, मोबाईल कॅमेराद्वारे चेहरा ओळख करून सत्यापन केले जाते. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, ''मोबाईल ॲपमुळे प्रक्रिया वेगवान, पारदर्शक व लाभार्थ्यांसाठी सुलभ झाली आहे.'' लाभार्थींनीही याचा सकारात्मक प्रतिसाद दिला असून, पूर्वीच्या चकरा मारण्याच्या त्रासापासून मुक्तता मिळाली आहे. जिल्हा प्रशासनाच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे शासनाचे कामकाज अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि जनसुलभ झाले असून, हा उपक्रम राज्यभर प्रेरणादायी ठरत आहे.

# ग्रामविकासासाठी तत्पर दवंगे यांना चंदनापुरी गटातून पसंती

## सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर व्यक्तिमत्त्वाला मोठा पाठिंबा

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**



संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी जिल्हा परिषद गट खुला प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याने इच्छुकांची मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामविकासासाठी सदैव तत्पर आणि धार्मिक–सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या भाजप तालुका सरचिटणीस गणेश दवंगे यांच्या नावाला नागरिकांकडून मोठा पाठिंबा मिळत आहे. हिवरगाव पावसा व पंचक्रोशीतील नागरिकांच्या मदतीसाठी नेहमी धावून जाणारे सामाजिक कार्यकर्ते म्हणून गणेश दवंगे यांची ओळख आहे. त्यांच्या पुढाकारातून गावात विविध विकासकामे व उपक्रम राबविण्यात आले आहेत. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विकासकामांना मंजुरी मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. राजकीय पार्श्वभूमी नसतानाही गणेश दवंगे यांनी शेती व व्यवसाय सांभाळत सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला आहे. सर्वसामान्य जनतेच्या सुखदुःखात सहभागी होऊन, त्यांच्या अडचणींचे निराकरण व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हे त्यांचे प्रमुख ध्येय राहिले आहे. त्यांच्या पत्नी सुजाता दवंगे यांनी हिवरगाव पावसा ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी पाच वर्षे यशस्वी कार्यकाळ पार पाडला. त्यांच्या कार्यकाळात गरीब कुटुंबांना घरकुल व अन्य शासकीय योजना मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. गणेश दवंगे यांनी देवगड रस्त्यावरील उंच पुलासाठी भाजपा पदाधिकारी व ग्रामस्थांच्या सहकार्याने मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांमुळे आज देवगड रस्त्यावर सेतू बांधकाम पूर्ण झाले आहे. तसेच देवगड यात्रा उत्सव समितीतून त्यांनी यात्रेच्या यशस्वी आयोजनात मोठा सहभाग नोंदविला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज, क्रांतिकारक उमाजी नाईक आदी महापुरुषांच्या जयंती उत्सवांमध्ये ते सक्रिय सहभाग घेतात. गोरगरीब व सर्वसामान्यांसाठी नेहमी धावून जाणारे, कार्यक्षम व लोकाभिमुख व्यक्तिमत्त्व असलेल्या गणेश दवंगे यांच्या नावाला चंदनापुरी गटातून व्यापक जनसमर्थन मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. रयत समाचार



# महात्मा फुले कृषि विद्यापीठात जागतिक अन्न दिवस साजरा

**राहुरी । रयत समाचार**

महात्मा फुले कृषि विद्यापीठात डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय येथे जागतिक अन्न दिवस आणि दीक्षारंभ २०२५ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे होते, तर सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी अन्नसुरक्षेचे महत्त्व अधोरेखित केले आणि उपस्थितांना ''ताटातील अन्न वाया जाऊ न देता सर्वांसाठी अन्नसुरक्षा राखूया'' असा संदेश दिला. या प्रसंगी प्रमुख व्याख्याते इंजी. सुरज थोरात यांनी विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी अंगी बाळगण्यासाठी मार्गदर्शन केले, तर व्यासपीठावर डॉ. विक्रम कड, डॉ. शैलेंद्र गडगे, आणि सहाय्यक कुलसचिव वैभव बारटक्के उपस्थित होते. कार्यक्रमात नाविन्यपूर्ण प्रकल्प स्पर्धा व पोस्टर सादरीकरण स्पर्धेतील विजेत्यांचे प्रशस्तीपत्रक वितरण करण्यात आले. नाविन्यपूर्ण प्रकल्पात प्रथम क्रमांक तनुजा गुजवणे, द्वितीय क्रमांक वैष्णवी भरते; पोस्टर सादरीकरणात प्रथम क्रमांक शुभम गायकवाड, ऋषिकेश निकम, तन्मय चव्हाण, सार्थक राजपूत, सुजल कर्डिले, आणि द्वितीय क्रमांक अगुश बस्ते व वैष्णवी सुतार यांना देण्यात आला. डॉ. विक्रम कड यांनी प्रास्ताविक केले, डॉ. सुनील फुलसावंगे यांनी सूत्रसंचालन, तर आभार डॉ. महेश पाचारणे यांनी मानले. कार्यक्रमात प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सामाजिक उपक्रमांनी मंगेश भागवत यांचा वाढदिवस साजरा

## पावन गणपती व जगदंब युवा प्रतिष्ठानचा पुढाकार

**पाथर्डी । नितीन गटाणी**



स्वतःचा वाढदिवस साजरा करताना इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करणे हेच खरे समाधान आहे. गरजूंना मदत करून त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य पाहण्यातच आयुष्याचे खरे समाधान दडलेले आहे, असे मत जगदंब युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रतीक खेडकर यांनी व्यक्त केले. शहरातील सामाजिक कार्यकर्ते मंगेश भागवत यांच्या वाढदिवसानिमित्त पावन गणपती प्रतिष्ठान आणि जगदंब युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांतर्गत दीपक महाराज काळे यांच्या श्रीकृष्ण गोशाळेला ३ टन चारा पुरवठा करण्यात आला. तसेच बेस्ट फाउंडेशनच्या गरजू विद्यार्थ्यांना शालेय पिशव्या व साहित्य वाटप करण्यात आले. निवासी मुकबधिर व मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन देऊन त्यांचा आनंद द्विगुणित करण्यात आला. याचबरोबर लोकमनोरंजनासाठी जोगदंड महाराज यांचे भारूड व अल्पोहाराचे आयोजन करण्यात आले. तसेच देवीचे धामणगाव येथील वैदूवस्ती व जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप असे उपक्रम पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पावन गणपती प्रतिष्ठानचे अध्यक्ष आजिनाथ डोमकावळे, प्रशांत शेळके, प्रसाद आव्हाड, प्रसाद भागवत, वैभव सोनपुरे, गणेश भाबड, अनुराग गुंगे, कुणाल पाचंगे, सदानंद भागवत, प्रसन्ना भागवत, तेजस पटवा व ओंकार सदावर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना ॲड. खेडकर म्हणाले की, ''सत्ता, पद, प्रतिष्ठा यापेक्षा समाजकार्यातून मिळणारे समाधान श्रेष्ठ आहे. अडचणीत असलेल्या माणसाला आधार देणे म्हणजेच खऱ्या अर्थाने माणुसकीची सेवा होय. युवकांनी आपल्या वाढदिवसानिमित्त वायफट खर्च टाळून समाजोपयोगी कार्य करावे,'' असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगेश भागवत यांनी केले असून शेवटी त्यांनी सर्वांचे आभार मानले. रयत समाचार

# अन्नाची नासाडी : सामाजिक गुन्हा

१६ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक अन्न दिन म्हणून साजरा केला गेला. जगभरात विविध दिन उत्साहात साजरे केले जातात. त्यापैकी अन्न दिन महत्वाचा मानावा लागेल, कारण त्याचा थेट मानवी जीवनाच्या आस्तित्वाशी संबंध आहे. अन्न सुरक्षेबाबतची एकंदर परिस्थिती पाहता अन्न दिनाबाबत जागरूकता वाढीस लागण्याची गरज आहे. परंतु आजही आपण अन्न सुरक्षेबाबत आणि अन्नाच्या नासाडी बाबत गंभीर नाहीत असेच म्हणावे लागेल.

अन्न हे पूर्णब्रह्म आहे अशी आपली संस्कृती सांगते पण ही संस्कृती आपण विसरत चाललो आहे की काय असा प्रश्न पडावा असा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. संयुक्त राष्ट्रे पर्यावरण कार्यक्रम आणि भागीदार संस्था डब्ल्यूआरएपी चा अहवालानुसार आपल्या देशात दरवर्षी ६८ दशलक्ष टन धान्याची नासाडी केली जाते. यातील ६१ टक्के अन्न घरातून, २६ टक्के अन्न सेवांमधून तर १३ टक्के अन्न किरकोळ क्षेत्रात वाया जाते. भारतासारख्या कृषिप्रधान देशात इतक्या मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाणे ही भूषणावह बाब नाही. भारतासारख्या विकसनशील देशात जिथे दररोज साठ टक्के लोक उपाशी किंवा अर्धपोटी झोपतात तिथे अन्नाची अशी नासाडी परवडणारी नाही. वाया जाणारे हे अन्न जर गोरगरिबांच्या, भुकेल्यांच्या मुखात पडले तर देशात कोणीही उपाशी झोपणार नाही पण आपल्याला आपल्या संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. आपल्याला हवे तेवढेच अन्न पानात काढून घ्यायचे आणि तेवढेच खायचे अशी आपली परंपरा आहे. खाऊन माजावे पण फेकून माजू नये अशी आपली आजी सांगायची हेही आपण विसरून गेलो आहोत. पाश्चात्य देशात हॉटेलातही पानातले अन्न टाकणे हा सामाजिक गुन्हा मानला जातो. भुकेने व्याकुळ झालेल्या लोकांची आठवणही अन्न टाकून देणाऱ्या या सोकावलेल्या श्रीमंतांना येत नाही. अन्नाची नासाडी हा सामाजिक गुन्हा आहे याचे भान अन्न टाकून देणाऱ्या श्रीमंतांना राहिले. नाही. पोटातील भुकेची आग भागवण्यासाठी देशातील कोट्यवधी लोक भीक मागतात. आदिवासी, दुर्गम भागात आजही लाखो लोक पुरेसे अन्न मिळत नाही म्हणून कुपोषित आहेत तर दुसरीकडे दररोज लाखो टन अन्न फेकून दिले जाते ही विसंगती बदलायला हवी. वाया जाणारे हे अन्न गोरगरिबांच्या मुखात पडेल अशी व्यवस्था असायला हवी. हैदराबाद, चेन्नई, दिल्ली, कोलकाता, मुंबई, बंगळुरु यासारख्या मोठ्या शहरात हॉटेल, रेस्टॉरंट, घरात उरलेले अन्न गरिबांना मिळावे यासाठी कम्युनिटी किचन ही संकल्पना अमलात आणली गेली. या संकल्पनेनुसार शहरातल्या विविध भागातल्या रस्त्यावरच्या कम्युनिटी किचन च्या केंद्रातल्या मोठ्या फ्रीजमध्ये उरलेले अन्न ठेवले जाते. भुलेल्यांनी ते काढून घ्यावे अशी सुविधा या केंद्रात आहे पण ही संकल्पना शहरातील मोठ्या शहरातच आहे, ती ही व्यापक नाही. कम्युनिटी किचन सारखी संकल्पना प्रत्येक शहरात व्यापक स्वरूपात राबवायला हवी म्हणजे वाया जाणारे अन्न भुलेल्यांच्या मुखात जाईल आणि अन्नाची नासाडीही थांबेल.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

# किल्ले बनवा महास्पर्धेचे आयोजन

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

सामाजिक कार्यकर्ते ॲड. सुशील कुमार गुलाबराव शिंदे यांनी प्रभाग क्रमांक २ मधील नागरिकांसाठी ''किल्ले बनवा महास्पर्धा २०२५'' आयोजित केली आहे. या स्पर्धेत प्रथम पाच स्थानांवर येणाऱ्यांसाठी बक्षिसे अशी ठेवण्यात आली आहेत: प्रथम बक्षिस ५५५५ रुपये, द्वितीय बक्षिस ३३३३ रुपये, तृतीय बक्षिस २२२२ रुपये, चतुर्थ बक्षिस १५५५ रुपये आणि पंचम बक्षिस ११११ रुपये. स्पर्धेसाठी नियम व अटी अशी आहेत की, सहभागीने ता.१८ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान नोंदणी करावी, स्वतः चे संपूर्ण नाव, पत्ता, जन्मतारीख आणि आधारकार्ड फोटो पाठवावा, तसेच दिवाळीनिमित्त आपल्या घरासमोर बनवलेल्या किल्ल्याचे पूर्ण व्हिडिओ, फोटो, किल्ल्यासह सेल्फी आणि कुटुंबासह किल्ल्याचा फोटो ९२३०३०९२९२ या नंबरवर पाठवावा. स्पर्धा फक्त प्रभाग क्रमांक ०२ मधील रहिवासींसाठी आहे, मात्र वयाचे कोणतेही बंधन नाही; सर्व वयोगटातील नागरिक सहभागी होऊ शकतात. बक्षीस वितरणाची तारीख, वेळ व ठिकाण स्वतंत्रपणे जाहीर केली जाईल, आणि अंतिम निर्णय आयोजकांचा राहील. ॲड. सुशीलकुमार शिंदे यांनी प्रभाग २ मधील नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. रयत समाचार



# शरदचंद्र पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू




**श्रीरामपूर । शफीक बागवान**

नॅशनल कमिशन फॉर होमिओपॅथिकच्या परवानगीनुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी बी.एच.एम.एस. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी श्रीरामपूर येथील शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल संस्थेला अधिकार मिळाला आहे. या निर्णयामुळे अहिल्यानगर आणि महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार होमिओपॅथिक शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. गेल्या ११ वर्षांपासून शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे. महाविद्यालयात अनुभवी आणि कुशल प्राध्यापक वर्ग विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत असून, आधुनिक शैक्षणिक सुविधा, सुसज्ज प्रयोगशाळा, वाचनालय आणि हॉस्पिटलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संपूर्ण व्यवहारिक ज्ञान दिले जाते. महाविद्यालय प्रशासनाच्या सूचनेनुसार, प्रवेशासाठीच्या प्राधान्यक्रम यादीत शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, श्रीरामपूर या महाविद्यालयाचे नाव समाविष्ट करावे. इच्छुक विद्यार्थ्यांनी सीईटी सेलच्या वेबसाईटवरून पुढील सूचना व वेळापत्रक तपासावे. शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल केवळ वैद्यकीय शिक्षण देत नाही, तर सामाजिक जबाबदारीची भावना जोपासून विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव आणि संशोधनाची वृत्ती विकसित केली जाते, असे अध्यक्ष डॉक्टर बाळासाहेब शिवाजीराव पवार यांनी सांगितले. रयत समाचार

# सौंदर्यभावना सर्वांचे ठायी

सौंदर्य-भावना विशिष्टांच्याच ठायी असते; हा अपसमज पसरवून विशिष्टांनी उर्वरित मानव समुहाला अवमानित केलं आहे. सौंदर्यभावना बीज रूपाने सर्वांच्याच ठायी आहे; फक्त त्या बिजाची नीट मशागत व्हायला हवी. नीट मशागत झाली की ते बीज अंकुरतं; त्याचा फुलोरा बहरून येतो. परंतु प्रातिभ बीज स्वतःत असूनही प्रयोगात नसेल तर, तर मग तिथेच विरून जातं. परंतु जे आपल्या या अद्भुत अशा प्रातिभबिजाची निगा राखतात ते त्याकडून सौंदर्यसंवेदना पावतात. प्रतिभा ही दैवी देणगी वगैरे काहीही नाही. ती मानव प्राण्यात जिनोमधून प्रवासत असते. या प्रवासात ती काहींची विस्मृत होते तर काहींची सस्मृत असते हेच पूर्वसंचित म्हणून पूर्वसूरींनी गौरविले आहे. एक लक्षात घ्यावे विस्मृतीला अथक साधना प्राप्त झाली की हरवलेले प्रातिभ सामर्थ्य पुन्हा प्राप्त होऊ शकते. या प्रातिभशक्तीमुळे कुणीही प्रयत्नरत माणूस हवे तसे स्वतःला घडवू शकतो. (उदा. शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, जननेता, कवी-कलावंत आणि संतसुद्धा.) प्रातिभासमृद्ध इसमाला लोक देवाची देणगी प्राप्त भाग्यवंत समजतात. मग उर्वरित लोकांवर देवाचा कोप झालाय असे समजावे काय? हा भ्रम ज्यांनी प्रस्थापित केला त्यांनी अनाकलनाने किंवा हेतूपूर्वक हा प्रमाद केला आहे. देव-दैवापायी माणूस प्रयत्नवंचित राहिलाय हे नाकारता येत नाही. प्रयत्नांती परमेश्वर हा मुद्दा मान्य केला तर परमेश्वर फक्त विशिष्टांचाच आहे हे सूत्र नापास होते; असो ! सौंदर्यशास्त्री बा. सी. मर्डेकरांनी सौंदर्यभावनेविषयी भाष्य करताना मेंदूला येणाऱ्या तीन प्रकारच्या संगतीचा संदर्भ दिला आहे. त्यांच्यामते मेंदू तीन प्रकारच्या संगती लाऊ शकतो. एक मानसशास्त्रीय, दुसरी तर्कशास्त्रीय आणि तिसरी सौंदर्यात्मक. पुढे ते म्हणतात, ''वाघाचे दृश्य घेऊ या. वाघ बघितल्यावर बघणाऱ्याला सर्कसची आठवण येईल; त्यावरून त्या विदूषकाचे काम करणाऱ्या मनुष्याच्या खासगी जीवनाबद्दल कल्पना सुचतील; त्यावरून मानव म्हणजे जगाच्या रंगभूमीवरचा विदूषक नव्हे का, असा विचार सुचेल. सुप्तासुप्त संज्ञाशक्तीतले हे सर्व प्रवाह दिसायला एखादे वेळेस असंबद्धही दिसतील. पण त्यातही एक प्रकारची संगती असते. ही मानसशास्त्रीय संगती. याच्यानंतर, वाघ हा हिंस्त्र प्राणी आहे आणि त्याने आपणावर झडप घातली तर आपला निकाल लागेल; तेव्हा आपण धूम ठोकली पाहिजे; ही तर्कशास्त्रीय संगती. आणि शेवटी, वाघाचा पिवळा रंग व त्यावरील काळे पट्टे एकमेकांना कसे खुलवतात; त्याच्या पाठीची वक्ररेषा आणि शेपटीची वक्र रेषा यांचे परस्परांना परिपोषक असे वर्तन ही सौंदर्यात्मक संगती.'' या तिन्ही संगती परस्परांच्या नातलग आहेत याबद्दल वाद नाही. मर्डेकरांनी तर्कशास्त्रीय संगतीत वाघ माणसाचा फडशा पाडतो, तो माणसाची शिकार करतो या आशयाचे तर्क व्यक्त केले आहेत; ते खरे आहेत. पण या तिन्ही संगतींचा विचार करताना आधी जैविक भावनेचा विचार करायला हवा. जैविक भावना सुरक्षित असेल तरच आपण वाघ आणि त्याच्या लिळांचा सौंदर्यात्मक आस्वाद घेऊ शकतो. तो सर्कसमधील वाघ असेल तर जैविकसुरक्षा अधिक वाटते पण तो पिंजऱ्यातून बाहेर पडायची शक्यता जाणवताच सारे प्रेक्षक जिवाच्या भयाने भयग्रस्त होत सर्कस सोडून भराभर बाहेर पडतील, हे सांगणे न लगे. म्हणूनच जैविकभावना प्रधान असून सौंदर्यभावना दुय्यम ठरते. जैविकभावना ही जीवन आहे तर सौंदर्यभावना जीवन अधिक सुंदर करण्याचे सूत्र आहे. मर्डेकरांचे दुसरे उदा. घेऊ या ''एका खोलीत एक लहान मूल निजले आहे आणि शेजारच्या खोलीत त्याची आई आहे. दूध पिण्याची वेळ होऊन ते मूल जागे होते आणि रडायला सुरूवात करते.'' स्वाभाविकच त्याच्या आईला हे बाळाचे भुकेने व्याकुळलेले रडणे ऐकू येताच ती धावत त्याच्याकडे जाईल, तिला दुधाचा-वात्सल्याचा पान्हा फुटेल. हे मूल गवयाचे असेल तर प्रथम काय होईल या संदर्भात मर्डेकर म्हणतात, ''ते मूल गवयाचे असल्याने नेहमी कोमल निषादात रडते. तेव्हा त्याने रडायला सुरूवात केल्यावर त्याच्या गळ्यांतून निघाणाऱ्या निरनिराळ्या सुरांचे कोमल निषादाशी असलेले जे संवादित्व याचे आकलन करीत जर त्याची आई बसली, तर तिला त्या संवादित्वाने आणि हुंदक्यांच्या समेने जो आनंद होईल तो सौंदर्यभावनेचा आनंद.'' पण गवयाचेच मूल कोमल निषादात रडते काय? हा प्रश्न अस्वस्थ करतोय. भारतीय शास्त्रीय संगीतात निषादाचे दोन प्रकार सांगितले आहेत. कोमल निषाद आणि शुद्ध निषाद आणि ते गवयाचे मूल असल्यामुळे त्या रडण्यालाही कोमल निषादाचे भान असते काय? मूळात मूल कोणाही आईचे असो-मग गायिका असो वा नाटकात दुष्ट खलनायिकेची भूमिका करणारी स्त्रीमधली आई असो, तिचे भुकेने व्याकुळलेले मूल रडायला लागले की तिला प्रथम वात्सल्याने दुथडी भरलेला पान्हाच फुटेल- मग त्याचे रडणे रडणे कुठल्या निषादात मोडते वगैरे नंतर. सौंदर्य म्हणजे नेमके काय. सौंदर्य म्हणजे चित्ताला लाभणारा आल्हाद. वाङ्मय कलाकृतीबद्दल बोलायाचे झाल्यास वाचकाला बोधात नेणे ही वाङ्मयकृतीच्या गुणवैशिष्ट्याची एक बाजू तर आल्हादानंद निर्माण करणे ही दुसरी बाजू. आल्हाद सावलीच्या सुखासारखाही असतो. वृक्ष काटेरी असो वा विषारी-अविषारी, त्याच्या सावलीचा गुणधर्म शीतलताच. म्हणून माणसानं एकदातरी स्वतःच्या सावलीशी संवाद करावा; खात्रीने सांगतोय, अंतःकरण आल्हादित होईल; उन्हात भिजणाऱ्या सावलीसारखं. आल्हाद म्हणजेच आनंद. संस्कृत साहित्यिक मम्मटाने म्हटलेय् की कवीची निर्मिती केवलानंदमयी असते. परंतु ज्ञानेश्वरादी संतांनी आनंदप्राप्ती प्रयोजनाला गौण मानले. कदाचित कलेपासूनची आनंद वा आल्हादप्राप्ती त्यांना मनोरंजनपर वाटली असावी. आल्हादानंदाने रसिकाला मनोविश्रांतस्थिती अनुभवता येते. कलेपासून मिळणारा बोधही आनंद रूपात सिद्ध हातो. हा आनंद सौंदर्यात्मकही असतो, आणि हाच शिवम् आणि सत्यम्ही असतो. या महाविश्वात सत्याइतुके अन्य दुसरे काही सुंदर नाही. पण सत्य कटू असते काय? नाही; सत्य फक्त सत्य असते आणि ते अंतर्मनाचे प्राणसत्त्व असते; सत्य एकाचवेळी सर्वांना मान्य होऊन प्रिय वाटेल असे घडत नाही. पण लोकाभिप्रायांशी सत्याचा संबंध नसतो. बर्नाड बोझंकिट यांनी सुंदर वस्तूंची तीन वैशिष्ट्ये सांगितली ती अशी-स्थिरता, संबद्धता आणि सार्वत्रिकता. त्याने पुढे प्रतिकृतीच्या सौंदर्याचेही विश्लेषण केले आहे. मी नेणीवेचा डोह या माझ्या लेखात एका ठिकाणी म्हटले आहे की आरशात प्रतिबिंब पाहण्यात मग्न असलेल्या सुंदरीला जेव्हा ती प्रतिबिंबाहून अधिक सुंदर आहे याचं ज्या क्षणी भान येतं तोच सौंदर्यानुभूतीचा अद्भुत क्षण. कवी तर प्रतिबिंबांचा स्वप्नपारखी असतो. तपस्वी कवीला पिकलेली प्रतिबिंब पारखता येतात. म्हणूनच त्यातील गर्भार बियांमधून तो प्रयोगशील निर्मितीचं नंदनवन सतत फुलवित असतो; असो. मेर्डेकर म्हणतात, सुंदर हे विशेषण आहे, ती वस्तू नाही. सुंदर या विशेषणापासून बनलेले सौंदर्य हे भाववाचक नाम आहे; हे बरोबरच आहे. आता एक वेगळा मुद्दा घेऊ या. आपण ज्याला कौरूप्य कुरूप म्हणतो, ती कुरूपता म्हणजे काय ? ढोबळमानाने रूपाविषयी बोलताना आपण सुंदर चेहरा आणि कुरूप चेहरा अशी वर्गवारी लावत असतो. विशेषकरून आपण गौरवर्णाला सौंदर्याचे प्रमाणपत्र देतो; पण ही वर्णवादी-वर्णवर्चस्ववादी गुणधारणा आहे. म्हणून काळ्या वर्णाच्या ऑफ्रिकन लोकानी ब्लॅक इज ब्युटीफुल ही सुंदरतेची मांडणी केली. बहुसंख्य मनुष्य समुदायाने रूढ केलेल्या संकल्पना सर्वदा ग्राहय मानल्याच पाहिजे असे कदापि शक्य नाही. ताजमहल सर्वांनाच सुंदर वाटतो असे नाही. शकील बदायुनी हा थोर कवी म्हणतोय, ''इक शहंशाहने दौलत का सहारा लेकर, हम गरीबोंकी मोहब्बत का उडाया मजाक.'' म्हणजेच अमूक एक वस्तु ही सर्वमान्य सुंदर नसते; तशीच ती सार्वकालिक नसते; मग सत्य हे सुंदर असेल तर तेही वरीलप्रमाणे सर्वमान्य आणि सार्वकालिक नसते काय? पण वस्तुची सुंदरता आणि सत्याची सुंदरता यातला फरक कळायला हवा. जन्म आनंदोत्सवी असा सुंदर असला आणि मृत्यु दुखदायी आणि कुरूप असला तरी सत्य या दोहोंमधले अबाधित अशी सनातन सुंदरता आहे. निर्मिकाने निर्माण केलेले हे विश्व आणि त्यातील प्रत्येक निर्मिती ही मूळात सुंदर आहे. विनाश आणि निर्मिती निरंतर असून नवरूपधारिणी आहे; कारण आपण रेणूंपासून निर्माण होतो आणि रेणूंमध्येच विसर्जित होतो. हे संपूर्ण ब्रम्हांडही मर्त्य आहे; इथे अमर असे काहीही नाही. नाही अनंत नाही अनादी. हे सर्व मर्त्यच आहे- हेच अंतिम सत्य आहे; आणि त्याची अभंग जाणीव सुंदर आहे. ज्याला हे उमगले तो जन्म आणि मृत्युमधला काळ आणि अवकाश मनाजोगा भोगून मृत्युला मित्र करू शकतो.

*(लेखक जगप्रसिद्ध कवी आहेत)*



सुधाकर गायधनी
------
साहित्यवार्ता

# सर्वसामान्यांचा कारखानदारांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा-आमदार राजळे



**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

कायम विनाअनुदानित तत्वावरील शाळांसारखी पाथर्डी तालुक्याची ओळख ही कायम दुष्काळी तालुका अशीच आहे. गेल्या पाच-दहा वर्षांत ही परिस्थिती काहीशी बदलली असली तरी कधी अतिवृष्टी तर कधी कमी पाऊस पडत असल्याने यात अनियमितताच आहे. त्यामुळे सहकारी साखर कारखाना चालवताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. प्रत्यक्षात ही तारेवरची कसरत असली तरी सर्वसामान्यांचा कारखानदारांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळाच आहे. असे मत आमदार मोनिका राजळे यांनी व्यक्त केले.

> यंदाचं वर्ष हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचं असल्याने इच्छुकांची मोठी गर्दी या कार्यक्रमात पहावयास मिळाली. यामध्ये झाडून सारे सरदार, दरकदार, हुजुरात व शागीर्दपेशा कार्यकर्त्यांसह खिदमदगारही मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम बंदिस्त जागेत घेतल्याने स्वतःची उपस्थिती दर्शविण्यासाठी अनेक सरदारांनी आमदार राजळे यांच्या परतीच्या वाटेवर खडी ताजीम दिली.

वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या बॉयलर अग्नीप्रदिपन सभारंभाप्रसंगी त्या बोलत होत्या. उपाध्यक्ष रामकिसन काकडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या समारंभप्रसंगी राष्ट्रीय कामगार संघटनेचे अध्यक्ष नितीन पवार, जेष्ठ संचालक उद्धव वाघ, बापुसाहेब भोसले, माजी नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुभाष बर्डे, नंदकुमार शेळके, अमोल गर्जे, विष्णुपंत अकोलकर, विष्णुपंत पवार, अनिल बोरुडे, शेषराव कचरे, विजयकुमार मंडलेचा, अंकुशराव कासुळे, सुभाष बुधवंत, श्रीकांत मिसाळ, संदीप पठाडे, कैलासराव देवढे, शुभम गाडे, सचिन नेहुल, बंडूशेठ बोरुडे, ज्योती शर्मा, मंगलताई कोकाटे, सिंधुताई साठे, कार्यकारी संचालक नितीन शिंदे, सचिव रविंद्र महाजन यांच्यासह उस उत्पादक सभासद व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान नारायण काकडे व त्यांच्या सहधर्मचारिणी नंदाताई काकडे यांच्या शुभहस्ते बॉयलर अग्नीप्रदिपनाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी, कारखान्याच्या वाटचालीविषयी बोलताना आमदार राजळे पुढे म्हणाल्या की, यावर्षी अतिवृष्टीमुळे शेतीपिकांसह शेतजमिनींचेही मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी उपजाऊ माती वाहून गेल्यामुळे मोठं नुकसान झालं आहे. इतर नुकसानींपेक्षा शेतजमिनींचं झालेलं नुकसान भरुन निघायला खूप मोठा कालावधी लागेल.

राज्य सरकारने सर्व नुकसानीसाठी ३२०० कोटी रुपयांचं पॅकेज जाहीर केलं आहे. महाराष्ट्रासारखं १३ कोटी लोकसंख्येचं राज्य चालवताना अनेक मर्यादा येतात. मानवनिर्मित चुका, नैसर्गिक आपत्ती व अशा अनेक गोष्टींमुळे साखर कारखाना चालविण्यात अडचणी येतात. तरीही त्यावर मात करत आपल्या कारखान्याने शेतकऱ्यांच्या उसाला २७२३ रुपये भाव दिला. गेल्यावर्षी कामगारांना १५ % बोनस दिला होता. यंदाही तितकाच बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वृद्धेश्वर परिवारातील सर्व संस्थांनी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाला २१ लक्ष रुपयांचा धनादेश दिला आहे.

यंदाच्या हंगामातील उसदराबाबत भाष्य करताना आमदार राजळे म्हणाल्या, यंदा आपण सर्वजण मोठ्या संकटाला सामोरं जात असतानाही शेजारी कारखान्यांच्या तोडीस तोड भाव देणार आहोत. भाव जाहीर केला नसला तरी तोटाही भरून काढायचा आहे. यंदा सहा लाख टन गाळपाचं उद्दीष्ट असलं तरी अनुभवी संचालक मंडळ व कामगारांच्या बळावर आपण ते साध्य करू असा आत्मविश्वास आहे. त्यामुळे, ऊस उत्पादक शेतकऱ्यांनीही त्यांचा ऊस कार्यक्षेत्राबाहेरील कारखान्यांना न देता आपल्याच कारखान्याला द्यावा. परस्पर सहकार्यानेच आपल्याला गाळपाचं उद्दीष्ट साध्य करता येईल. त्यासाठी परिपक्व झालेलाच ऊस कारखान्याला द्यावा. इथेनॉल निर्मिती व नवीन कामे हाती घेण्यात आल्याने कारखान्याला तोटा होणार असल्याने त्याचाही विचार सर्वांनी करावा, असे आवाहन शेवटी त्यांनी उपस्थितांना केले. जेष्ठ संचालक सुभाष ताठे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, आर. बी. शेख यांनी सूत्रसंचालन केले तर राहुल राजळे यांनी आभार प्रदर्शन केले. रयत समाचार

# शनैश्वर देवस्थान कायद्याच्या कचाट्यातील कामगारांचा पगार लवकरच

**नेवासा । विजय खंडागळे**

जागतिक दर्जाचे श्री क्षेत्र शनिशिंगणापूर देवस्थान बरखास्तीनंतर शासनाच्या अधीन राहून चालू असताना, कामगारांचे पगार प्रश्न तात्कालीन विश्वस्त व शासकीय व्यवस्थापन समितीच्या न्यायालयीन वादामुळे अडकले होते. याबाबत व्यवस्थापक कार्यकारी समितीचे सदस्य राजेंद्र वाकचौरे यांनी माहिती दिली की, लेखा परीक्षकाच्या तपासणीनंतरच कामगारांचे पगार देण्यात येणार आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पगार बिलाची तपासणी केली जाईल. यामध्ये कर्मचाऱ्यांची एकूण संख्या, विभागीय कर्मचाऱ्यांवर देण्यात येणारा पगार आणि सर्व संबंधित बाबींची काटेकोर तपासणी केली जाईल. दोन-तीन दिवस देवस्थान ॲक्शन मोडवर असून, योग्य तपासणी करूनच अहवालाद्वारे प्रशासनाकडून पगार देण्याची प्रक्रिया मार्गी लागू होईल. दरम्यान कर्मचाऱ्यांची यादी गुप्त ठेवून पगार वितरणासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. सध्या शनेश्वर देवस्थानाचा दैनंदिन कारभार महाराष्ट्र राज्याचे विधी व न्याय खात्याच्या आदेशानुसार अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अधिपत्याखाली कार्यकारी ११ सदस्यांच्या समितीद्वारे चालवला जात आहे. या कारभारात केवळ दैनंदिन खर्च आणि कर्मचाऱ्यांचा पगार यावर लक्ष केंद्रीत केले जाईल, ज्यामुळे अडकलेले पगार लवकरच कर्मचाऱ्यांना मिळणार आहेत. रयत समाचार